मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसाचे होणार 'मेगा सेलिब्रेशन'

## भोसरीसह पंचक्रोशीत १०० + कार्यक्रमांचा 'धुमधडाका'


**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त तब्बल १०० हून अधिक सामाजिक उपक्रम अन् सांस्कृतिक कार्यक्रमांचा 'धुमधडाका' होणार आहे. विशेष म्हणजे, पंचक्रोशीतील गावनिहाय आयोजन केल्याचे दिसते. त्यामुळे लांडगे समर्थक व हितचिंतकांनी यंदाचा वाढदिवस 'ग्रँड सेलिब्रेट' करण्याचा संकल्प केल्याचे चित्र आहे.

कोणताही कार्यक्रम किंवा सामाजिक उपक्रम भव्य-दिव्य साजरा करणारा लोकप्रतिनिधी अशी आमदार महेश लांडगे यांची महाराष्ट्रभरात ओळख आहे.













महाराष्ट्रातील सर्वात मोठी इंद्रायणी थडी जत्रा, भारतातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत आणि इंडिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या दिशेने वाटचाल करणारी 'रिव्हर सायक्लोथॉन-२०२३' असा गर्दीचा उच्चांक गाठणाऱ्या उपक्रमांमुळे आमदार लांडगे महाराष्ट्रभरात चर्चेत असतात.

लांडगे समर्थक आणि मित्र परिवाराच्या माध्यमातून प्रतिवर्षी त्यांच्या वाढदिवसानिमित्त दि. २७ नोव्हेंबर रोजी अभिष्ठचिंतन सोहळा होतो. २०२१ मध्ये दि. १ नोव्हेंबर ते ३ डिसेंबरपर्यंत असे महिनाभर विविध कार्यक्रमांचे नियोजन केले होते. गतवर्षी आमदार लांडगे यांना मातृशोक झाला. त्यामुळे समर्थकांनी त्यांचा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला होता. तत्पूर्वी, कोविड महामारी आणि पश्चिम महाराष्ट्रातील पूरपरिस्थिती आणि कोकणातील निसर्ग चक्रीवादळाच्या संकटामुळे वाढदिवस साजरा करता आला नाही. आता यावर्षी वाढदिवस थाटात साजरा करण्याचा संकल्प आमदार लांडगे समर्थक आणि त्यांच्याशी संबंधित विविध संस्था, संघटनांनी केला आहे.

### सामाजिक बांधिलकी, नेत्याप्रति आदरभाव

» सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक यासह आरोग्य विषयक उपक्रमांची महिनाभर रेलचेल राहणार आहे. यावर्षी दिवाळीनंतर दि. १८ नोव्हेंबरपासून ते दि. ९ डिसेंबरपर्यंत २० दिवस भरगच्च कार्यक्रमाचे नियोजन केले आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध कलावंतांना यानिमित्ताने निमंत्रित केले आहे. महान भारतकेसरी, महाराष्ट्र केसरी अशा बैलागाडा शर्यती चाकण- राजगुरूनगर परिसरात होणार आहेत. यासोबतच महाराष्ट्रातील सर्वांत मोठे अश्व व देशी गोवंश पशू प्रदर्शनही मोशीत होणार आहे. पर्यावरण व इंद्रायणी नदी संवर्धनाचा संदेश देण्यासाठी 'वर्ल्ड रेकॉर्ड'कडे वाटचाल करणारी 'रिव्हर सायक्लोथॉन-२०२३', जॉय स्ट्रिट- २०२३, सोसायटीधारकांसाठी क्रिकेट स्पर्धा, महिलांसाठी खेळ रंगला पैठणीचा, मोफत बाल जत्रा, भीमाशंकर-ओझर-लेण्याद्री देवदर्शन, मुलांसाठी विविध स्पर्धा, हास्यजत्रा अशा विविध कार्यक्रम निगडी, तळवडे, चिखली, जाधववाडी, मोशी, डुडूळगाव, चऱ्होली, दिघी, भोसरी, नेहरुनगर या सोबतच जिल्ह्याच्या ग्रामीण भागात विविध कार्यक्रम होणार आहेत.

# शहरातील वायू प्रदूषण रोखण्यासाठी देखरेख पथकांची नेमणूक

## आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या सूचना

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहरातील वायू प्रदूषणाला आळा घालण्यासाठी तसेच मार्गदर्शक सूचनांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रभागनिहाय विशेष पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. महापालिकेने नव्याने लागू केलेल्या उपाययोजनांतर्गत महापालिका कार्यक्षेत्रातील ३२ प्रभागांमध्ये एकूण १६ विशेष वायु प्रदूषण देखरेख पथक तैनात करण्याच्या सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. या पथकांमध्ये उपअभियंता, स्वच्छता निरीक्षक, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक आणि एमएसएफ कर्मचारी यांचा समावेश आहे. वायू प्रदूषण नियंत्रण पथकाचे प्राथमिक कर्तव्य त्यांच्या संबंधित प्रभागातील बांधकाम स्थळांना भेट देणे, फोटो किंवा व्हिडिओग्राफीद्वारे त्याची नोंद घेणे, यादरम्यान प्रदूषण नियंत्रण तरतुदींचे पालन न केल्याचे उघड झाल्यास दंड आकारणे, नोटिस जारी करणे किंवा कामाची जागा सील करून दंडात्मक कारवाई करणे हे असणार आहे. नोटीस बजावलेल्यांची संख्या, वसूल केलेला दंड आणि दररोज होणाऱ्या कारवाईची या पथकांद्वारे नोंद ठेवण्यात येणार आहे. पर्यावरण संरक्षण कायदा १९८६, वायू (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा १९८१ नुसार नियमांचे उल्लंघण करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार खाजगी आणि सार्वजनिक अशा दोन्ही प्रकारच्या बांधकाम सुरू असलेल्या इमारतींच्या बाजूने हिरवे कापड तसेच ज्यूट शीट ताडपत्रीने कव्हर करणे बंधनकारक असणार आहे. बांधकाम पाडताना त्यावर सलग पाणी फवारणे शिंपडणे तसेच काम सुरू असताना त्यासाठी लागणारे बांधकाम साहित्य लोडींग अनलोडींग दरम्यान पाणी फवारले जाईल याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच या उपाययोजनांसाठी जवळच्या महापालिका सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या पुनर्वापर केलेल्या पाण्याचा वापर करावा. शिवाय, शहरातील बांधकामाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, सेन्सरवर आधारित वायू प्रदूषण मॉनिटर्स बसविणे आणि बांधकाम कर्मचार्यांसाठी वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे वापरणे यावरही भर दिला जाणार आहे.

# शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या कोणावरही अन्याय होणार नाही : श्रीरंग बारणे

## विविध कार्यकर्त्यांच्या शिवसेनेत प्रवेश; उपजिल्हाप्रमुखपदी बशीर सुतार



### उपजिल्हाप्रमुखपदी बशीर सुतार, चिंचवड विधानसभा प्रमुखपदी संतोष बारणे

» शिवसेना उपजिल्हाप्रमुखपदी बशीर सुतार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर, चिंचवड विधानसभा प्रमुखपदी संतोष बारणे, पिंपरी विधानसभा प्रमुखपदी निखिल येवले,पिंपरी विधानसभा महिला संघटिकापदी शैला निकम, चिंचवड विधानसभा संघटिकापदी शारदा वाघमोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विधानसभा उपप्रमुख, विभागप्रमुख, उपविभागप्रमुख, शाखा प्रमुख, विभाग संघटिका, शाखा संघटिका, विभाग समनव्यक अशा विविध पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

**पिंपरी । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकार जनहिताचे निर्णय घेत आहे. दिवाळीपूर्वी नागरिकांना आनंदाचा शिधा वाटप केले जात आहे. महिला बचत गटांसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर विश्वास ठेवून विविध पक्षातील कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करत आहेत. पक्षात आलेल्या प्रत्येकाला न्याय दिला जाईल. कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी सरकारच्या योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन शिवसेना उपनेते, खासदार श्रीरंग बारणे यांनी केले. पिंपरी-चिंचवड शहर शिवसेना व युवासेना महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी यांची आढावा बैठक खासदार बारणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. आकुर्डीत बुधवारी झालेल्या बैठकीत २५० जणांनी खासदार बारणे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. पदाधिकारी नियुक्ती पत्र वाटप करण्यात आले. १५० महिलासह विविध पदाधिकारी यांना पद वाटप करण्यात आले. जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, प्रमुख मावळ शरद हुलावळे, शहर प्रमुख निलेश तरस, महिला जिल्हा संघटिका शैला पाचपुते, पिंपरी-चिंचवडच्या शहर संघटिका सरिता अरुण साने, मा नगरसेविका विमलताई जगताप चिंचवड विधानसभा महिला संघटिका शारदा वाघमोडे, पिंपरी विधानसभा महिला संघटिका शैला निकम, युवासेना पुणे जिल्हाध्यक्ष विश्वजित बारणे देहू शहर प्रमुख सुनील हगवणे आदी उपस्थित होते.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, शिवसेनेचे मुख्य नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वार राज्यातील जनतेचा कार्यकर्त्यांच्या मोठा विश्वास आहे. त्यामुळेच विविध पक्षातील लोक शिवसेनेत येत आहे. शहरात शिवसेनेची ताकद वाढत आहे. आमच्यावर विश्वास ठेवून कार्यकर्ते मोठ्या संख्येने शिवसेनेत येत आहेत. पक्षात आलेल्या कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही. सर्वांना न्याय दिला जाईल. पक्ष संगठना वाढविण्यासाठी कामाला लागा. संघटन मजबूत करायचे आहे. शिवसेना-भाजपचे संघटन वाढीचे काम उत्तमप्रकारे सुरू आहे.

# दिपावलीमध्ये आतषबाजी करण्यासाठी वेळेचे बंधन?

## अंमलबजावणी करण्यासाठी प्रभागनिहाय विशेष पथकांची नेमणूक

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहरातील वायू प्रदूषणाला आळा घालण्यासाठी तसेच मार्गदर्शक सूचनांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रभागनिहाय विशेष पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. महापालिकेने नव्याने लागू केलेल्या उपाययोजनांतर्गत महापालिका कार्यक्षेत्रातील ३२ प्रभागांमध्ये एकूण १६ विशेष वायु प्रदूषण देखरेख पथक तैनात करण्याच्या सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. या पथकांमध्ये उपअभियंता, स्वच्छता निरीक्षक, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक आणि एमएसएफ कर्मचारी यांचा समावेश आहे. वायू प्रदूषण नियंत्रण पथकाचे प्राथमिक कर्तव्य त्यांच्या संबंधित प्रभागातील बांधकाम स्थळांना भेट देणे, फोटो किंवा व्हिडिओग्राफीद्वारे त्याची नोंद घेणे, यादरम्यान प्रदूषण नियंत्रण तरतुदींचे पालन न केल्याचे उघड झाल्यास दंड आकारणे, नोटिस जारी करणे किंवा कामाची जागा सील करून दंडात्मक कारवाई करणे हे असणार आहे. नोटीस बजावलेल्यांची संख्या, वसूल केलेला दंड आणि



दररोज होणाऱ्या कारवाईची या पथकांद्वारे नोंद ठेवण्यात येणार आहे. पर्यावरण संरक्षण कायदा १९८६, वायू (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा १९८१ नुसार नियमांचे उल्लंघण करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. महापालिकेने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार खाजगी आणि सार्वजनिक अशा दोन्ही प्रकारच्या बांधकाम सुरू असलेल्या इमारतींच्या बाजूने हिरवे कापड तसेच ज्यूट शीट ताडपत्रीने कव्हर करणे बंधनकारक असणार आहे. बांधकाम पाडताना त्यावर सलग पाणी फवारणे शिंपडणे तसेच काम सुरू असताना त्यासाठी लागणारे बांधकाम साहित्य लोडींग अनलोडींग दरम्यान पाणी फवारले जाईल याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच या उपाययोजनांसाठी जवळच्या महापालिका सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या पुनर्वापर केलेल्या पाण्याचा वापर करावा.शिवाय, शहरातील बांधकामाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, सेन्सरवर आधारित वायू प्रदूषण मॉनिटर्स बसविणे आणि बांधकाम कर्मचाऱ्यांसाठी वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे वापरणे यावरही भर दिला जाणार आहे. आयुक्त शेखर सिंह म्हणाले, घनकचऱ्यासह इतर कोणत्याही प्रकारचा कचरा उघड्यावर जाळण्यास सक्त मनाई असून नागरिक स्मार्ट सारथी ॲपमध्ये दिलेल्या पोस्ट अ वेस्ट या सुविधेद्वारे अशा घटनांची तक्रार करू शकतात. विशेषत: कचरा डंपिंग ग्राउंड आणि संभाव्य कचरा जाळण्याच्या ठिकाणीही उघड्यावर कचरा जाळण्यास बंदी लागू करण्यात आली आहे.

# राज्यातील शिक्षक आता १९६७ पूर्वीच्या मराठा कुणबी, मराठा नोंदींच्या शोधात!

## सरकारने कुणबी प्रमाणपत्रे देण्यास केली सुरुवात

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यातील शाळांमध्ये सहामाही परीक्षा संपून दिवाळीच्या सुटीचे वेध लागले असताना आता १९६७ पूर्वीच्या मराठा कुणबी, मराठा विद्यार्थ्यांचे दाखले, नोंदी शोधण्याचे काम शिक्षकांना करावे लागणार आहे. त्यामुळे शिक्षकांना आता शाळेतील जुनी कागदपत्रे, नोंदी काढून शोध घ्यावा लागणार असून, वेळेत काम पूर्ण न झाल्यास दिवाळीच्या सुटीतही शाळेत येऊन काम करावे लागण्याची शक्यता आहे. गेल्या काही महिन्यांपासून राज्यात मराठा आरक्षणाचा विषय तापला आहे. राज्य सरकारने कुणबी प्रमाणपत्रे देण्यास सुरुवात केली आहे. तसेच मराठा समाजाला मराठा कुणबी जात प्रमाणपत्र देण्यासाठीची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने राज्यातील शाळांतील १९६७पूर्वीच्या विद्यार्थ्यांच्या मराठा, मराठा, कुणबी असल्याचे दाखले, नोंदी शोधण्याच्या सूचना सरकारने दिल्या आहेत. त्यात दाखले, नोंदी शोधून स्कॅन करून त्याची माहिती ११ नोव्हेंबरपूर्वी सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्हा स्तरावर बैठका घेऊन दाखले, नोंदणी शोधण्याचे काम करण्याच्या सूचना राज्यातील शिक्षकांना देण्यात आल्या आहेत. या नोंदी, दाखले शोधण्याची




कार्यपद्धतीही ठरवून देण्यात आली आहे. त्यामुळे जवळपास साठ वर्षांपूर्वीच्या विद्यार्थ्यांची कागदपत्रे शोधण्याचे काम आता शिक्षकांना करावे लागणार आहे. तसेच दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दिवाळीच्या सुटीत बोलावले जाण्याबाबतही स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. शाळांमध्ये सहामाही परीक्षा असतानाही शिक्षकांना ग्रामपंचायत निवडणुकीची कामे करावी लागली. त्यात आता कुणबी नोंदणी शोधण्यासाठी ६० वर्षांपूर्वीची कागदपत्रे तपासण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या कामाचा शिक्षकांवर ताण पडणार आहे. दिवाळीची सुटी लक्षात घेऊन अनेकांनी गावी जाणे, सहलीला जाण्याचे नियोजन केले होते. मात्र, तातडीचे काम आल्याने आता सर्व नियोजन कोलमडणार आहे. तसेच त्यात काही चुका, उणिवा राहिल्यास, विलंब झाल्यास त्याचाही मनस्ताप शिक्षकांनाच सहन करावा लागणार आहे, असे काही शिक्षकांनी सांगितले. मोडी लिपी, सीमा भागात अन्य भाषा येणाऱ्यांची गरज अनेक जुनी कागदपत्रे मोडी लिपीत आहेत. त्यामुळे जुन्या नोंदी शोधण्यासाठी आता मोडी लिपी वाचता येणाऱ्यांची आवश्यकता निर्माण झाली आहे. तसेच सीमेवरील गावांमध्ये त्या भाषा येणाऱ्यांचा शोध घ्यावा लागत आहे.

### प्रमाणपत्र देण्यासाठीची कार्यपद्धती

» मराठा समाजाला मराठा कुणबी जात प्रमाणपत्र देण्यासाठीची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने राज्यातील शाळांतील १९६७पूर्वीच्या विद्यार्थ्यांच्या मराठा, मराठा, कुणबी असल्याचे दाखले, नोंदी शोधण्याच्या सूचना सरकारने दिल्या आहेत. त्यात दाखले, नोंदी शोधून स्कॅन करून त्याची माहिती ११ नोव्हेंबरपूर्वी सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्हा स्तरावर बैठका घेऊन दाखले, नोंदणी शोधण्याचे काम करण्याच्या सूचना राज्यातील शिक्षकांना देण्यात आल्या आहेत. या नोंदी, दाखले शोधण्याची कार्यपद्धतीही ठरवून देण्यात आली आहे.

# पुणे विद्यापीठातील पीएनआर क्रमांक खुले

## अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना २५ नोव्हेंबरपर्यंत अर्ज भरण्याची संधी

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सत्र पूर्तता संपुष्टात आलेल्या २०१३-१४ वर्षापासूनच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी उपलब्ध झाली आहे. संबंधित विद्यार्थ्यांचे कायमस्वरुपी नोंदणी क्रमांक मंगळवारपासून खुले झाले आहेत. कुठलाही अभ्यासक्रम विशिष्ट कालावधीत पूर्ण करण्याचे बंधन असते. या मुदतीनंतर संबंधित विद्यार्थ्यांचा कायमस्वरुपी नोंदणी क्रमांक कायमस्वरुपी बंद होतो. त्यांना कितीही इच्छा असली तरी परीक्षा देता येत नाही. ही स्थिती लक्षात घेऊन सत्र पूर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांचे पीआरएन क्रमांक खुले होण्यासाठी कुलगुरु, व्यवस्थापन परिषद आणि परीक्षा विभाग प्रमुखांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे (युजीसी) पाठपुरावा केल्यामुळे अशा विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी उपलब्ध झाली आहे. मंगळवारी सायंकाळी पाचपासून पीआरएन क्रमांक बंद झालेल्या विद्यार्थ्यांना अर्ज भरता येईल. अर्ज भरण्याची लिंक खुली झाली आहे. २५ नोव्हेंबरपर्यंत ही




लिंक कार्यान्वित राहील, अशी माहिती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सागर वैद्य यांनी दिली. अभ्यासक्रमाच्या अंतिम किंवा त्याआधीच्या वर्षात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षेची संधी मिळणार आहे. २०१३ च्या पध्दतीनुसार कला शाखेतील ४१ हजार, वाणिज्य शाखा (पदवी) ३१ हजार २८८, विज्ञान सात हजार ९८६, वाणिज्य शाखा (पदव्युत्तर) २५१५ या व्यतिरिक्त विधी, बीएड असे पुणे, नगर व नाशिक जिल्ह्यातील ९० हजारहून अधिक विद्यार्थी आहेत.

### विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी

» कुठलाही अभ्यासक्रम विशिष्ट कालावधीत पूर्ण करण्याचे बंधन असते. या मुदतीनंतर संबंधित विद्यार्थ्यांचा कायमस्वरुपी नोंदणी क्रमांक कायमस्वरुपी बंद होतो. त्यांना कितीही इच्छा असली तरी परीक्षा देता येत नाही. ही स्थिती लक्षात घेऊन सत्र पूर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांचे पीआरएन क्रमांक खुले होण्यासाठी कुलगुरु, व्यवस्थापन परिषद आणि परीक्षा विभाग प्रमुखांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे (युजीसी) पाठपुरावा केल्यामुळे अशा विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी उपलब्ध झाली आहे. मंगळवारी सायंकाळी पाचपासून पीआरएन क्रमांक बंद झालेल्या विद्यार्थ्यांना अर्ज भरता येईल. अर्ज भरण्याची लिंक खुली झाली आहे. २५ नोव्हेंबरपर्यंत ही लिंक कार्यान्वित राहील, अशी माहिती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सागर वैद्य यांनी दिली.

# पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालकपदी रणजीत तावरेंची निवड

## एकमेव अर्ज आल्याने, ही निवडणूक बिनविरोध



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दोन महिन्यांपूर्वी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदाचा राजीनामा दिला होता. अजित पवारांच्या राजीनाम्यानंतर पार्थ पवार यांची पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक पदावर निवड होण्याची शक्यता होती. मात्र अखेरच्या क्षणी अजित पवार यांनी रणजीत तावरे यांना संचालक पदाची संधी दिली. या संचालकपदाच्या निवडीनंतर अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दोन महिन्यांपूर्वी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे संचालक पद रिक्त झाले होते. त्यानंतर संचालक पदासाठी निवडणुक जाहीर केल्यानंतर आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याची वेळ ११ वाजता होती. त्यावेळी रणजीत अशोक तावरे यांचा एकमेव अर्ज आल्याने, ही निवडणूक बिनविरोध होती. रणजीत अशोक तावरे यांची संचालक पदी निवड करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची ऑनलाइन नोंदणी!

## स्विफ्टचॅट या उपयोजनाद्वारे विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदवली जाणार

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांतील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती आता १ डिसेंबरपासून ऑनलाइन नोंदणी केली जाणार आहे. स्विफ्टचॅट या उपयोजनाद्वारे विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदवली जाणार आहे. राज्यातील शिक्षण क्षेत्रातील माहिती संकलन आणि विश्लेषण प्रक्रिया अधिक वेगवान, सुलभ होण्यासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेतर्फे पुण्यात विद्या समीक्षा केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांची उपस्थिती ऑनलाइन नोंदवण्यासाठी अटेन्डन्स बॉटच्या वापराचे प्रशिक्षण विभाग, तालुका, केंद्र स्तरावरील शिक्षकांना देण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक प्रदीपकुमार डांगे यांनी या विद्यार्थ्यांची उपस्थिती ऑनलाइन नोंदवण्याबाबतचे निर्देश परिपत्रकाद्वारे दिले. राज्यातील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती



वर्गशिक्षकांनी स्विफ्टचॅट उपयोजन डाऊनलोड करून त्या उपयोजनावरील ॲटेन्डन्स बॉटद्वारे ऑनलाइन नोंदवणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, अनुदानित शाळेतील शालार्थ क्रमांक उपलब्ध शिक्षकांना अटेन्डन्स बॉटद्वारे उपस्थिती नोंदवता येईल. उपस्थिती नोंदवताना शिक्षकांनी शाळेचा युडायस क्रमांक आणि स्वतःच्या शालार्थ क्रमांकाचा वापर करावा. शालार्थ क्रमांकासाठी वापरलेलाच मोबाइल क्रमांक वापरावा. मोबाइल क्रमांक बदलला असल्यास तो शालार्थ संकेतस्थळावर अद्ययावत करणे गरजेचे आहे. सेवार्थ आणि इतर प्रणालीतील शिक्षकांना विद्यार्थ्यांची उपस्थिती ऑनलाइन नोंदवण्याबाबत स्वतंत्रपणे सूचना दिल्या जातील. दोन सत्रांत भरणाऱ्या शाळांसाठी सकाळी सात ते दुपारी बारा, तर शाळांसाठी सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत विद्यार्थी उपस्थितीची नोंद अटेन्डन्स बॉटवर करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. एखाद्या शाळेतील एखाद्या वर्गाची तुकडी विनाअनुदानित असल्यास त्या वर्गातील विद्यार्थ्यांची उपस्थिती त्याच शाळेतील अनुदानित शिक्षकांचा शालार्थ क्रमांक वापरून नोंदवावी, चॅटबॉटद्वारे उपस्थिती नोंदवताना शालार्थ क्रमांकासाठी अडचणी आल्यास इतर शिक्षकांचा शालार्थ क्रमांक वापरून ऑनलाइन उपस्थिती नोंदवावी, विद्यार्थी उपस्थिती नोंदवताना अडचणी येत असल्यास शालार्थ संकेतस्थळ, सरल संकेतस्थळ, युडायस या सर्व संकेतस्थळातील माहिती अद्ययावत करावी. सर्व संकेतस्थळावरील अडचणी दूर झाल्यावर अडचणी दूर होतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.